# दत्तात्रय महाराज कळंबे जावली सहकारी बँक लि.
# DMK JAOLI SAHAKARI BANK

(नोंदणी क्र. बी. ओ. एम. / बी. एन. के. / १२७ ऑफ १९७३)
प्रशासकीय कार्यालय : ४१८/२०/२२, मौलाना आझाद मार्ग, मुंबई-४०० ००४.
दूरध्वनी क्र.: ०२२-२३८६२३५२, Website : https://www.dmkjaoli.bank.in,
Email ID: hoadmin@dmkjaoli.bank.in, hoscr@ dmkjaoli.bank.in

## ५३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची **५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि.२१.०६.२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता, "डॉ. अँटोनिओ डी-सिल्व्हा हायस्कुल, एस.के.बोले रोड, कबुतरखान्याजवळ, दादर (पश्चिम), मुंबई- ४०० ०२८"** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे. ही विनंती.

## ❖ सभेपुढील विषय ❖

१. दिनांक २२ जुन, २०२५ रोजी संपन्न झालेल्या ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, वैधानिक लेखा परिक्षकांनी प्रमाणीत केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचे वाचन करुन त्यास स्विकृती देणे.

३. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२५-२०२६ च्या करण्यात आलेल्या नफा-विभागणीस मान्यता देणे.

४. वैधानिक लेखा-परिक्षकांचा सन २०२५-२०२६ चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या वैधानिक लेखा परिक्षण दोष-दुरुस्ती अहवालाची (Compliance Report) नोंद घेणे.

५. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

६. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पुर्व मान्यतेने आर्थिक वर्ष २०२६-२०२७ करीता करण्यात आलेल्या वैधानिक लेखा परीक्षकांचे नियुक्तीबाबत नोंद घेणे आणि त्यांना अदा करावयाचा मेहनतांना ठरविण्याचे अधिकार बँकेच्या संचालक मंडळ सभेस प्रदान करणे.

७. माहे ३१ मार्च, २०२६ अखेर बँकेचे संचालक सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना अदा करण्यात आलेल्या कर्जाची नोंद घेणे.

८. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात सभासदांचे प्रशिक्षणाकरीता राबविलेले कार्यक्रम व आगामी कालावधितील धोरण यांचा आढावा घेणे.

९. संचालक मंडळाने शिफारस केल्यानुसार बँकेच्या उपविधीचे दुरुस्तीस मान्यता देणे.

१०. ५३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची गैरहजेरी क्षमापीत करणे.

११. मा. अध्यक्षांचे परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

**संचालक मंडळाचे संमतीने**
**ठिकाण : मुंबई** — **ईश्वरदास दयाराम लालवाणी**
**दिनांक : ०५.०६.२०२६** — **मुख्य कार्यकारी अधिकारी**

## -: विशेष सुचना :-

१. गणसंख्येपूर्ती अभावी सभा तहकूब करावी लागल्यास सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर म्हणजेच सकाळी ठीक १०.३० वाजता सुरु होईल व त्या सभेच्या कामकाजाच्या वेळी गणसंख्यापूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

२. वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरळीत होण्यासाठी ज्या सभासदांना विधायक स्वरुपात काही प्रश्न, सूचना मांडावयाच्या असतील अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी काही माहिती विचारावयाची असेल त्यांनी **दि.१२.०६.२०२६** पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय, ४१८/२०/२२, मौलाना आझाद मार्ग, मुंबई-४०० ००४ या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत तपशिलवार लेखी स्वरुपात अथवा **hoscr@dmkjaoli.bank.in** या ई-मेल आयडीवर पाठविल्यास त्याप्रमाणे वार्षिक सर्वसाधारण सभेत माहिती, खुलासा सादर करणे सोयीचे होईल.

३. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सूचनेनुसार सर्व सभासदांनी / खातेदारांनी के.वाय.सी. **(K.Y.C.)** बाबतच्या कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक आहे. ज्या सभासदांच्या पत्त्यात बदल झाला आहे किंवा वारसाची नोंद केलेली नाही त्यांनी या बाबींची त्वरीत पुर्तता करुन घ्यावी. त्याकरिता आपल्या शाखेत संपर्क करावा.

४. बँकेचा सन २०२५-२०२६ चा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या वेबसाईट **https://www.dmkjaoli.bank.in** वर प्रसिध्द करण्यात आलेला असुन प्रत बँकेच्या सर्व शाखांत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.